श्री. केशव जगन्नाथ शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड यांना महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी संवर्ग समावेशनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमातील तरतुदी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. टिपीव्ही-१२१४/२८०/प्र.क्र.४८/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०१६.

वाचा :- १. नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्र.एमसीओ-१२०३/१२४६/सीआर-१७५/०३/ नवि-१४, दि.११.०१.२००७.
२. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.नपप्रसं/कक्ष-५/संवर्ग समावेशन/०४/२००८, दि.०३.१०.२००८.
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-१२१४/७१/प्र.क्र.९/नवि-२७, दि.२१.०८.२०१४.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.आस्था/सनर-श्रे-१/गट-ब/ना.नि./प्रशा-१/४५३७, दि.२२.०८.२०१४.
५. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/सनर-श्रे-१/गट-ब/ना.नि./प्रशा-१/४५३७, दि.२२.०८.२०१४.

प्रस्तावना :-

श्री. केशव जगन्नाथ शिंदे यांची रायगड जिल्हा निवड समितीच्यावतीने दि.२९.०१.१९९९ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीनुसार पनवेल नगरपरिषदेच्या आस्थापनेवर दि.१९.०२.१९९९ पासून पाणी-पुरवठा विभागात “कनिष्ठ अभियंता” पदावर वेतनश्रेणी रु.१४००-४०-१८००-५०-२३०० मध्ये ०१ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता नेमणूक करण्यात आली होती. श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार यांचा पनवेल नगरपरिषद येथील “कनिष्ठ अभियंता” पदाचा ०१ वर्षाचा परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्याने त्यांना पनवेल नगरपरिषदेच्या दि.०८.११.२००० रोजीच्या ठरावाद्वारे पनवेल नगरपरिषदेच्या सेवेत कायम करण्यात आले होते.

०२. तसेच **संदर्भ-१** येथील नगर विकास विभाग, शासन अधिसूचना, दि.११.०१.२००७ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरे अधिनियम राज्यसेवा (समावेशन, सेवा प्रवेश व सेवा शर्ती) नियम, २००६ मधील नियम ५ (४) मधील तरतूदीनुसार दि.०१.०१.२००८पासून राज्यातील नगरपरिषद सेवांमधील **(१) महाराष्ट्र राज्य नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य/विद्युत/संगणक), (२) महाराष्ट्र राज्य नगरपरिषद पाणीपुरवठा, मलनि:स्सारण व स्वच्छता**

अभियांत्रिकी सेवा, (३) महाराष्ट्र राज्य नगरपरिषद करनिर्धारक व प्रशासकीय सेवा, (४) महाराष्ट्र राज्य नगरपरिषद अग्निशमन सेवा व (५) महाराष्ट्र राज्य, नगरपरिषद, नगर रचना व विकास सेवा या पाच संवर्गातील कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी संवर्गात (राज्य शासकीय कर्मचारी) अटी व शर्तीवर समावेशन करण्यात आले आहे.

०३. नगर विकास विभाग, शासन अधिसूचना दि.११.०१.२००७ मधील तरतुदीनुसार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी त्यांचे आदेश, दि.०३.१०.२००५ अन्वये श्री. के. ज. शिंदे, कनिष्ठ अभियंता, पनवेल नगरपरिषद, पनवेल यांचे यांच्या सेवा "महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी" संवर्गात राज्य शासकीय कर्मचारी म्हणून त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून समावेशनाने दि.०१.०१.२००८ पासून जोडून दिलेल्या आहेत.

०४. तद्नंतर, श्री. के. ज. शिंदे, कनिष्ठ अभियंता, पनवेल नगरपरिषद, पनवेल यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि.२१.०८.२०१४ अन्वये नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवर "सहाय्यक नगर रचनाकार-श्रेणी-१ (गट-ब / राजपत्रित)" (वेतन संरचना रू.९,३००-रू.३४,८००+ग्रेड पे रू.४,४००) पदावर शासन सेवेत नियुक्ती करण्यात आलेली आहे. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन आदेश, दि.२२.०८.२०१४ अन्वये श्री. के. ज. शिंदे हे दि.२६.०९.२०१४ (म.नं.) पासून सहाय्यक संचालक, नगर रचना, अलिबाग शाखा, अलिबाग, जि. रायगड कार्यालयातील "सहाय्यक नगर रचनाकार" पदावर रुजू झाले आहेत.

०५. श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगछ-अलिबाग शाखा, जि.रायगड यांना नगर विकास विभाग, शासन अधिसूचना, दि.११.०१.२००७ अन्वये विहित केलेल्या सेवेच्या अटी व शर्ती लागू करण्याबाबत संचालक, नगर रचना, पुणे यांनी मार्गदर्शनपर प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

०६. सबब, श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड यांना नगर विकास विभाग, शासन अधिसूचना, दि.११.०१.२००७ अन्वये विहित केलेल्या सेवेच्या अटी व शर्ती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

श्री. केशव जगन्नाथ शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड यांना नगर विकास विभाग, शासन अधिसूचना, दि.११.०१.२००७ अन्वये विहित केलेल्या व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि.०३.१०.२००८ च्या आदेशातील खालील अटी व शर्ती लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. सेवा-शर्ती नियम ९ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये विहित केल्यानुसार श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार यांच्या खाती त्यांना सामावून घेण्यापूर्वी, जमा असलेली संपूर्ण रजा पुढे नेवून ती त्यांच्या खाती जमा दाखविण्यात यावी व त्यानुसार त्यांच्या खाती जमा असलेल्या रजेचा लाभ त्यांना देण्यात यावा.

ब. सेवा शर्ती नियम ११ मधील तरतूदीनुसार श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार यांनी पनवेल नगरपरिषदेत केलेल्या आधीच्या सेवेमुळे त्यांना देय असलेले निवृत्तीवेतन अशंदान हे शासन विनिर्दिष्ट करील अशा दराने, व्याजासह रक्कम व अनुज्ञेय असलेली रजा अंशदानाची रक्कम शासनाला प्रदान करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, पनवेल नगरपरिषद, पनवेल यांनी तातडीने करावी.

क. श्री. के. ज. शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार यांचे सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी खाते उघडण्यास अनुमती देण्यात येत आहे. त्यानुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

ड. सेवा-शर्ती नियम १२ मधील तरतूदीनुसार श्री. के. ज. शिंदे यांच्या समावेशनाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, पनवेल नगरपरिषदेच्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजनेन्वये नियंत्रित केलेल्या व त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यात जमा असलेली वर्गणीची रक्कम, कोणतीही असल्यास, त्यावरील व्याजासह, त्या दिनांकापासून मुंबई सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९५१ व्दारे नियंत्रित केलेल्या त्यांच्या नवीन खात्यात हस्तातंरीत करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, पनवेल नगरपरिषद, पनवेल यांनी करावी.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.३०५/१५/सेवा-६, दि.०९.१०.२०१५, क्र.३४०/१५/सेवा-६, दि.३०.१०.२०१४ व सामान्य प्रशासन विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.१२८/१३-अ, दि.१९.१२.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीव्दारे निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक २०१६०२०६१०४५२६०३२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dilip Sitaram Anerao

Digitally signed by Dilip Sitaram Anerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=26293749901b04ac59c3d853c2fdc32df6083d811902b3e94b40b924fa028887, cn=Dilip Sitaram Anerao
Date: 2016.02.08 11:23:14 +05'30'

(दि. सि. अणेराव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. मा. मुख्य मंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०.
५. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. **(३-प्रती)**
६. सह संचालक, कोंकणा विभाग, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
७. सहाय्यक संचालक, नगर रचना, अलिबाग शाखा, अलिबाग, जि. रायगड.
८. श्री. केशव जगन्नाथ शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना, अलिबाग शाखा, अलिबाग, जि. रायगड यांना (संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)
९. निवडनस्ती / नवि-२७.

*****